## फास्ट न्यूज

# निती आयोगाचे राजीव कुमार उपाध्यक्ष



नवी दिल्ली : केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने नियोजन आयोग मोडीत काढून स्थापलेल्या निती आयोगाच्या उपाध्यक्षपदी अर्थतज्ज्ञ डॉ. राजीव कुमार यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. अरविंद पनगढिया यांच्या राजीनाम्यानंतर केंद्र सरकारने राजीव कुमार यांना उपाध्यक्षपदावर संधी दिली आहे. तर दिल्लीतील एम्समधील बालरोगतज्ज्ञ डॉ. विनोद पॉल यांची निती आयोगाचे सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.